**Rayat Shikshan Sanstha's**

# Abasaheb Marathe Arts and New Commerce, Science College, Rajapur.

**(VikhareGothane) Dist. Ratnagiri (Maharashtra)**

**Faculty of Arts**

In Collaboration with IQAC

**Topic: -'21st Century: Literature, Society and Environment.'**

**Date: 14th March 2020**


**Editorial Board -**

Chief Editor - Prin. Dr. P.G. Pawar

Convener – Prof. Dr. A. P. Ubale

Co Convener – Prof. Dr. B. P. Naik

Co Convener – Prof. Dr. G. D. Harale

Treasurer - Prof. K. I. Mulani

Organizing Secretary - Prof. Mr. A. A. Londhe

**Review Board –**

Prof. A. S. Mali

Prof. Dr. O. P. Maurya

## Index


| Sr. No. | Title of Articles and Authors | Page No |
|---|---|---|
| 1. | **तर्कसंगत भावनिक उपचार पद्धती : विधी आणि उपयोजन** <br> *श्री नरोटे गोरक्ष लक्ष्मण* | 01-05 |
| 2. | **भारतातील चिरंतन विकास व पर्यावरण** <br> प्रा. बी. आर. नदाफ | 06-09 |
| 3. | **वारांगणांच्या व सर्वसामान्य स्त्रियांच्या मुलांच्या सामाजिक वर्तनाचा अभ्यास** <br> पर्वत प्रदिप कांबळे | 10-16 |
| 4. | **कलम ३७० व ३५अ आणि जम्मू-काश्मीरची स्वायत्तता** <br> **श्री**. साके लक्ष्मण वैजेनाथ | 17-22 |
| 5. | **मूकनायक: डॉ.बाबासाहेब आंबेडकर** <br> डॉ. सावंत जयपाल चंद्रकांत | 23-28 |
| 6. | **CHECKLIST ON AVIAN DIVERSITY OF NISHAN TALAV, TALUKA-VENGURLA. (MAHARASHTRA)** <br> G. H. Kawale[1], N. N. Ugale[2], P. D. Natekar[3], H. A. Parab[4] | 29-34 |
| 7. | **A JOURNEY OF INDIAN WOMAN AGAINST PATRIARCHY WITHIN: A SPECIAL REFERENCE TO MEENA KANDASAMY'S POETRY** <br> Dr. Jadhav N. L | 35-37 |
| 8. | 21 व्या शतकातील आंतरराष्ट्रीय संबंध : भारत आणि दक्षिण आशिया <br> प्रा. डॉ. किशोर कल्लापा म्हेत्री | 38-45 |
| 9. | **CLIMATE CHANGE AND IMPACTS ON INDIA** <br> Dr. Anil V. Sawant | 46-48 |
| 10. | **A STUDY ON DEVELOPMENT OF INDIAN FINANCIAL SYSTEM** <br> Prof. Suresh J.Patil[1] Swapnali Hanamant Mahagavakar[2] | 49-53 |
| 11. | **GLOBAL ECONOMIC CRISIS IN 21$^{ST}$ CENTURY AND INDIAN ECONOMY** <br> Dr. Santosh Barale | 54-58 |
| 12. | सोलापूर जिल्हयातील कर्त्या व बिगर कर्त्या लोकसंख्येतील बदल अभ्यासणे <br> **प्रा. डॉ. महेंद्र गजधाने** | 59-62 |
| 13. | **पर्यावरणाचे स्थायी विकास** <br> Dr. B.S.Patil | 63-67 |
| 14. | **ENVIRONMENT AND SUSTAINABLE DEVELOPMENT** <br> Mr. Talib Najir Mulla | 68-78 |
| 15. | **TRENDS AND SPATIAL PATTERN OF MEDICAL FACILITY IN SOLAPUR DISTRICT: A GEOGRAPHICAL ANALYSIS** <br> Dr. Bhosale Govind Jalindar | 79-84 |
| 16. | **DEVELOPMENT REGIONS OF LIVESTOCK FARMING IN SOLAPUR DISTRICT** <br> Dr. Shivaji Shankar Maske | 85-91 |

| | | |
|---|---|---|
| 17. | **शंकरराव जगताप आर्टस् ॲण्ड कॉमर्स कॉलेज, वाघोलीमधील ग्रंथालयात क्यु आर कोड (QR CODE) टेक्नॉलॉजीचा वापर**<br>श्री. प्रविण चंद्रकांत कुंभार | 92-96 |
| 18. | **ICT INITIATIVES OF MHRD: AN OVERVIEW**<br>Supriya M. Nawale | 97-102 |
| 19. | **ICT IN ACADEMIC LIBRARIES**<br>Shirke Anil Ananda | 103-107 |
| 20. | **वाचन आजच्या काळाची गरज**<br>**सौ. शितल सावंत** | 108-111 |
| 21. | **एकविसाव्या शतकातील शैक्षणिक ग्रंथालय**<br>डॉ.विजयकुमार एन.मुलीमनि | 112-116 |
| 22. | हिंदी कहानी साहित्य मे वृध्दावस्था विमर्श<br>डॉ.संगिता सूर्यकांत चित्रकोटी | 117-121 |
| 23. | **२१ वीं सदी के हिंदी साहित्य में नारी विमर्श**<br>डॉ. ज्योती गायकवाड | 122-124 |
| 24. | मीडिया और भारतीय समाज<br>डॉ. श्रीकांत पाटील | 125-127 |
| 25. | **Post-colonial Ghanaian SocietyinA. K. Armah's *The Beautyful Ones Are Not Yet Born***<br>Santosh Chandrakant Rade | 128-132 |
| 26. | **Postulation of Love, Separation, Destinyand Reunion in Ravinder Singh's Popular Fiction *I Too Had A Love Story***<br>Mr. Kshirsagar Rajendra Baban | 133-138 |
| 27. | **21ST CENTURY AS A MIRROR FOR WOMEN EMPOWERMENT**<br>Dhanshri S. Bhadalkar | 139-142 |
| 28. | **CHALLENGES OF WOMEN EMPOWERMENT IN INDIAN RURAL AREA: ANALYTICAL STUDY**<br>Prof. Manasi Chandrakant Kawatkar | 143-149 |
| 29. | **DALIT LITERATURE IN INDIA: AN OVERVIEW**<br>Inamdar M.M. | 150-152 |
| 30. | **Study of Feminine Sensibility and Female Psyche with Reference to Vijay Tendulkar's *Kanyadaan* and *Sakharam Binder***<br>Babasaheb Ramdas Kangune | 153-158 |
| 31. | **समकालीन वाड्.मयीन संस्कृती**<br>प्रा. डॉ. बाळासाहेब आण्णा सतार | 159-166 |
| 32. | महात्मा गांधीजींच्या स्त्रीविषयक विचारांची चिकीत्सा<br>**प्रा.निकम एम.एस** | 167-173 |
| 33. | **जागतिकीकरणाचा प्रभाव असलेली मराठी कविता**<br>प्रा. अनिल प्रभाकर उबाळे | 174-179 |
| 34. | **जागतिकीकरण व मराठी कादंबरी**<br>प्रा. अनिल प्रभाकर उबाळे | 180-183 |
| 35. | **दलित स्त्रीकवितेची वेगळी फिर्याद**<br>प्रा. डॉ. बाबासाहेब पिरगोंडा नाईक | 184-187 |
| 36. | **'दलित कविता स्वरुप आणि वाटचाल'** | 188-190 |

| | | |
|---|---|---|
| | प्रा. डॉ. बाबासाहेब पिरगोंडा नाईक | |
| 37. | **THE INHUMAN PRACTICE OF UNTOUCHABILITY IN DR. B.R. AMBEDKAR'S *WAITING FOR A VISA***<br>Dr. Syed Nisar Karim | 192-194 |
| 38. | 21 व्या शतकातील स्त्रीजीवन<br>प्रा. डॉ. नामदेव कृष्णा मोळे | 195-199 |
| 39. | **स्त्रीकोष: एकविसाव्या शतकातील स्त्रीवादाचा नवा चेहरा**<br>प्रा. डॉ. सर्जेराव जाधव, डॉ. संदीप जाधव | 200-208 |
| 40. | ***CHANDALIKA*: REALITY, RELIGION AND ILLUSION**<br>Dr. Manoj B Gadekar | 209-211 |
| 41. | **THE ROLE OF DALIT LITERATURE IN DALIT MOVEMENT**<br>Dinesh Sitaram Betkar | 2012-216 |
| 42. | मराठी स्त्रियांची आत्मकथने: एक चिंतन<br>डॉ. शहाजी ज. पाटील | 217-220 |
| 43. | नादिरा बब्बर के नाटकों में सामाजिकता''<br>विजय देवकर | 221-224 |
| 44. | **भारताच्या आंतरराष्ट्रीय संबंधाचा विकास आणि श्रीलंका संबंध**<br>प्रा. प्रमोद अरविंद देसाई | 225-234 |
| 45. | **CHALLENGES AND CHANGING NATURE OF RURAL FAMILY SYSTEM**<br>Prof. Prasad Suresh Bhagwat | 235-240 |
| 46. | **KRISHI VIGYAN KENDRA: A POWERFUL TOOL FOR DISSEMINATION OF AGRICULTURAL TECHNOLOGY**<br>Prof. Gaurav G. Pawar | 241-245 |
| 47. | **MUKUL DEVA'S LASHKAR: A GRIPPING TALE OF TERROR, COUNTER TERROR AND TERRIBLE FALL-OUT**<br>Mr. Mali Abhimanyu Sopan | 246-248 |
| 48. | **TRENDS OF AREA, PRODUCTION AND PRODUCTIVITY OF SUGARCANE IN SOLAPUR DISTRICT: A GEOGRAPHICAL STUDY**<br>Dr. G. D. Harale[1] Prof. K. I. Mulani[2] | 249-256 |
| 49. | भारतीय शेतीपुरक व्यवसाय – शेळीपालन<br>श्री. व्ही. व्ही. कासले | 253-255 |
| 50. | महिला सबलीकरणातील मानसिक अडथळे<br>*श्री नरोटे गोरक्ष लक्ष्मण* | 260-264 |
| 51. | साहित्यरत्न अण्णा भाऊ साठे यांच्या कथा व कादंबरीतील नायक व नायिका<br>आकाश राजाराम चव्हाण | 265-269 |
| 52. | **CHANGES IN INDIAN FINANCIAL SYSTEM IN 21ST CENTURY WITH SPECIAL REFERENCES TO BANKING SYSTEM**<br>Sudarshan Vinayak Thakur | 270-279 |
| 53. | **THE ASSESSMENT IMPACT OF SACRED SPACE AND PILGRIMAGE CENTER: A CASE STUDY OF PANDHARPUR**<br>Dr. Bharat Maruti Sule | 280-295 |
| 54. | **WOMEN EMPOWERMENT AND PRESENT SCENARIO.**<br>Mrs. Roshanara Shaikh | 296-301 |
| 55. | ''एकविसाव्या शतकातील जबाबदार स्त्री व भारतीय संस्कृती.''<br>श्री. अजितकुमार भिमराव पाटील | 302-307 |

| | | |
|---|---|---|
| 56. | **EFFECT OF WHATSAPP ON COLLEGE GOING STUDENTS**<br>Mr.Yogesh K Kulkarni | 308-314 |
| 57. | **पूर्वाश्रमीच्या अस्पृश्यांच्या व बौद्धांच्या वाड़मयीन साहित्याची समाजाभिमुखता**<br>प्रा. प्रमोद एस. मेश्राम | 315-319 |
| 58. | **PROBLEMS AND PROSPECTS OF RAJAPUR TALUKA TOURISM SECTOR**<br>Dr. Ghansham Harale | 320-326 |
| 59. | **इक्कीसवीं सदी में प्रवासी हिंदी ब्लागरों का योगदान**<br>प्रा. संजय वसंत निंबाळकर | 327-331 |
| 60. | **SPATIO-TEMPORAL DISTRIBUTION OF SOCIO-ECONOMIC FACILITIES IN SATARA DISTRICT: A GEOGRAPHICAL ANALYSIS**<br>Dr. Magar T.R. | 332-347 |
| 61. | **21 वे शतक आणि स्त्री’**<br>गाभणे हेमा गजानन | 348-352 |

*Studies in Indian Place Names* ISSN: 2394-3114
UGC Care Listed Journal
Vol-40-Issue-89-March -2020

# महात्मा गांधीजींच्या स्त्रीविषयक विचारांची चिकीत्सा

**प्रा.निकम एम.एस**

छत्रपती शिवाजी कॉलेज,सातारा.

**प्रस्तावना :**

भारताच्या इतिहासात महात्मा गांधीजींच्या नेतृत्वात झालेला स्वातंत्र्य लढा व त्यात सत्य,अहिंसा या तत्वांचा झालेला वापर हे एक अविस्मरणीय पर्व राहीले आहे.महात्मा गांधीजींनी अवलंबलेल्या मार्गावर जनता सर्वस्व अर्पण करायला तयार होती.गांधीजींच्या नेतृत्वात असहकार आंदोलन,सविनय कायदेभंग व चलेजाव चळवळ ही तीन मोठी आंदोलनांचा समावेश होतो.यात सविनय कायदेभंग व चलेजाव चळवळ यातील स्त्रियांच्या सहभागी होण्याचे प्रमाण जास्त होते.

**उद्देश :**

भारताच्या इतिहासात यापूर्वी कधीही स्त्रिया एवढया बहुसंख्येने स्वातं स्वातंत्र्याच्या प्राप्तीसाठी घरांच्या चौकटी ओलांडून बाहेर पडल्या नव्हत्या.गांधीजींच्या नेतृत्वावर एवढया बहुसंख्य महिलांनी का विश्वास दाखवला यात भारतीयच नाही तर काही परदेशी महिलाही सहभागी झाल्या.या बाबी तपासण्यासाठी गांधीजींचा महिलांविषयींचा दृष्टिकोण बघणे आवश्यक आहे. हाच या शोधनिंबधाचा उद्देश आहे.

**विचार :**

भारतात गांधीजींचे पुनरागमन झाल्यावर त्यांना भारतातल्या बहुसंख्य महिलांची दयनीय अवस्था दिसली.गांधीजींच्या दृष्टिने आता महिलांचे सशक्तीकरण व स्वातंत्र्याची आवश्यकता अग्रक्रमाने होती. त्यांच मत होत की स्त्रियांमध्ये पुरूषांसारख्या समान मानसिक व बौध्दिक व अध्यात्मिक क्षमता विद्यमान आहेत.तिच्यातले विद्यमान गुण म्हणजे त्याग,सत्य,अहिंसा,सहनशिलता यामूळे स्त्री ही पुरूषांपेक्षा महत्वपूर्ण सिध्द होते.याच गुणांची कदर गाधींजी करतात.[१] तुलना केल्यास दोन्ही बाजूंनी गुण समान असणे आवश्यक आहे.नाहीतर आजच्या काळात स्त्रिया करतात ते दुय्यम आणि पुरूष करतात ते सर्व प्रथम दर्जाचे असे समाजात मानण्याचा अलिखीत प्रघातच पडला आहे.एक मोठा काळ मजुर व कामगार महिला हया महिला व पुरूषांचे काम एकच असुनही मजुरीत तफावत भोगत होत्या.

**आईकडून मिळालेला वारसा :**

गांधीजींनी सर्व प्रकारची दुर्बलता संपविण्यासाठी सशक्तीकरणाचे सामूहिक प्रयत्नास प्राधान्य दिले. त्यांच्या दृष्टिने दारिद्रयदलित व महिलांचा विकास हा सर्वात महत्वपूर्ण होता.गांधीजींना जेवढे भारतीय

 Copyright ⓒ 2020 Authors

स्वातंत्र्य महत्वाचे वाटत होते. तेवढेच मागासलेल्या व समाजातील मूळ प्रवाहातून बाहेर पडलेल्या घटकांचे प्रगत होणे व बंधनाच्या साखडयातून मोकळे होणे महत्वाचे मानत होते.गांधीजी राजकीय व सामाजिक दोन्ही प्रकारच्या आंदोलनाच्या सफलतेसाठी स्त्रियांना ते भावी संसाधन व शक्तीच्या रूपात ते बघतात.यासाठी ते महिलांनी मोठया संख्येने आंदोलनात यावे म्हणून प्रयत्न करतात.हा वारसा त्यांना स्वत:च्या आईकडून मिळाला.ते म्हणतात की “माझ्यात जे काही चांगले असेल ते माझ्या आईकडून मिळाले आहे.यामूळे मी कधीही महिलांच्याकडे पापवासनेच्या नजरेतून पाहीले नाही. त्यांच्या प्रती मला आईवडीलांइतकीच श्रध्दा आहे.[२] इतका आदर गांधीजी आखिल नारी जातीबद्दल ते व्यक्त करतात.एक महान माणसाने आपल्या आईबद्दल निरपेक्ष आदर व्यक्त करणे खरेतर आखिल स्त्री जातीचा तो एक बहुमान ठरतो.

**गुणांची देवाण घेवाण :**

महात्मा गांधीजीचे मत होते की, स्त्री व पुरूष या दोघांमधल्या असणाऱ्या चांगल्या गुणांचे एकत्रिकरण झाले तर दोघांचेही व्यक्तिमत्व पूर्णत्वाला येईल.यामुळे गांधीजींच्या संपर्कात ज्या स्त्रिया आल्या त्यांना पुरूषी गुण स्वत:त विकसित करण्याची व पुरूषांना स्त्रियोचित गुण विकसित करण्याची संधी ते देत.गांधीजीनी फक्त मत व्यक्त केले नाही तर त्याला प्रात्यक्षिकाची जोड दिली.कित्येक पुरूषांना स्वयंपाक, काहींना आजाऱ्याची सेवा तर काहींना लहान मुलांचे संगोपन शिकवले.चंपारण्यात शेतकऱ्यांच्या समस्या सोडविताना त्यांनी गावात रचनात्मक कार्यक्रम राबवण्यासाठी ज्यांची नेमणूक केली. त्यात अधिक संख्येने महिला होत्या.शाळा चालविण्यापासून ते मुलांच्या ऊवा व नखे काढण्यापर्यंत सर्व कामे त्यांना सोपविली [३].इतका विश्वास त्यांना आपल्या महिला कार्यकर्त्यांवर होता.याठीकाणी त्यांचे वेगळेपण उठून दिसते.कारण आपल्या विचारांना ते व्यक्त करून थांबत नव्हते, तर विचारांची अम्मलबजावणी होण्यासाठी तेवढेच जागरूक होते. बहुतांश वेळा विव्दावानांकडून मोठे मोठे आकर्षक विचार मांडले जातात पण त्यांच्या अम्मलबजावणीकडे मात्र मोठे दुर्लक्ष झालले दिसून येते. याबाबतीत गांधीजींना दाखवलेली सक्रीयता महत्वपूर्ण ठरते.

**स्त्री सामर्थ्यावर विश्वास :**

गांधीजींना स्त्रीशक्ती विषयी अपार श्रध्दा होती.स्त्रियांना अबला म्हणने हा ते स्त्रियांचा अपमान समजत होते.बल हया शब्दाचा शारीरिक अर्थ घेतला तर पुरूष सबळ ठरेल तर बल या शब्दाचा अर्थ नैतिक बळ असा घेतल्यास तर स्त्रिया या पुरूषांपेक्षा कांकणभरही कमी ठरणार नाही. जर पुरूषांनी स्त्रियांना वश केले नसते किंवा ती वश झाली नसते तर सगळया जगाला स्त्रियांनी आपल्या सामर्थ्याचे


Copyright ⓒ 2020 Authors

दर्शन दाखवले असते.कायदे बनवणाऱ्या पुरूषांनी स्त्रियांवर जे अध:पतन लादले याची त्यांना भयंकर शिक्षा भोगावी लागेल.यापुढे जाऊन गांधीजी इशारा व स्त्रियांबद्दलचा ठाम विश्वास व्यक्त करताना म्हणतात की, जेव्हा स्त्रिया पुरूषांच्या जाळयातून बाहेर पडतील तेव्हा अहिंसक असूनही बंड कमी परिणामकारक राहणार नाही.[४] याठिकाणी गांधीजी स्त्रीयांच्या आत्मशक्तीवर व क्रांतीकारक भूमिकेकडे लक्ष वेधतात.त्यांच्या ताकदीवर विश्वास ठेवताना आखिल पुरूष जातीला स्त्रीयांना बंधमुक्त करण्याचा इशाराही देतात.

**स्त्री—प्रथांवरची मते :**

गांधीजीं विधवांच्या प्रश्नांबाबत वेगळे मत मांडतात.पुनर्विवाहाच्या बाबतीचे स्वातंत्र्य विधवांनाच देतात.पण त्यांची इच्छा नसेल तर विधवा म्हणून राहू इच्छणाऱ्या महिलांना याबाबतीत हिन दृष्टिने बघू नये.आंतरजातीय विवाह हा कमीपणा मानण्याच्या ते विराधी होते.विवाहाच्या वयाच्या कायद्याच्या बाबतीत ते स्त्रियांच्या बाजूने होते.तर संपत्तीत स्त्रियांना वाटा मिळावा या मताचे ते होते.बालविवाहाच्या बाबतीत त्यांचे मत असे होते कीकमी वयात विवाह केल्याने लोकांची शारीरिक व नैतिक शक्ती ही लवकर अकाली समाप्त होते.शारीरिक कामनेच्या विचाराने मन दुषित होते व पुरूषांमधील महिलांच्या सन्मानाची वृत्ती संपते.[५] स्त्रियांच्या प्रश्नावर गांधीजींची मते ही आधुनिक समाजसुधारकांसारखी आहेत. राजकीय का सामाजिक सुधारणा आधी यासांरख्या प्रश्नात न पडता दोन्ही गोष्टी एकाचवेळी साधण्याचा त्यांचा विचार खरोखरीच स्तुत्य आहे.

**विचारांधील मर्यादा :**

स्त्रिवादाच्या भूमिकेतून विचार केल्यास गांधीजीची काही मते पटत नाहीत. म्हणजे ते महिलांचे मुख्य कार्यस्थळ फक्त घर हेच मानतात.ज्यात राहून स्त्रीने कर्तव्याचे पालन करावे यासाठी घराची व्यवस्था ठेवण्याची कला महिलांनी शिकायला हवी.आर्थिक जबाबदारी आलीच तर घरात राहूनच करावी.म्हणजे पुरूषांनी घराच्या बाहेर पडून अर्थार्जन करावं व महिलांनी गृहव्यवस्था व शिशुपालन ही कर्तव्य पार पाडावी.पुढे ते म्हणतात की अशा विभाजनाची ही व्यवस्था नैसर्गिक आहे. आक्रमकता हे अप्राकृतिक आहे.याचा हट्ट महिलांनी धरू नये.[६]

याठिकाणी गांधीजींच मत पारीवारिक चौकटीला धक्का न लागू न देण्याचे आहे.या विचारांचा स्त्रिवादाच्या कसौटीवर घासून पाहिल्यास जीवनाच्या सर्व क्षेत्रातील विषमता व शोषण नष्ट करणे हा स्त्रिवादाचा उद्देश आहे. सिमाँ दि बूव्हा यांचे मत पुरूषांची सेवा करताना स्त्रिया स्वत: एक वस्तू बनल्या.[७] एका बाजुला महात्मा गांधी पुरूषांना स्त्रियांच्या कामाचा अनुभव देतात व दुसऱ्या बाजुला ते महिलांनी

 Copyright ⓒ 2020 Authors

फक्त घरात बंदिस्त राहून त्याशी निगडीत कामाला बांधून घेतात.व दोघांच्या मधील भेदाची रेषा ठरवून देतात.एक विचित्र विरोधाभास त्यांच्या विचारांत दिसतो.

**सक्रिय भूमिका :**

महात्मा गांधीजींनी स्त्रियांच्या काही प्रश्नांना सोडविण्यासाठी सक्रिय कार्य केले.यंग इंडिया मधून 'बालविवाह एक शाप' या नावाने लेख प्रसिध्द केला.नेमका यावेळी समाजसुधारकांचा यासाठी प्रयत्न सुरू होते.याला यामुळे मदत मिळून सारडा कायदा पास झाला.[८]

पडदा पध्दत ही उच्चवर्णियापासून ते सर्वसामान्यापर्यंत उत्तर भारतात सर्वत्र रूढ झाली होती.या पध्दतीमधून स्त्रियांचा समाजाकडे डोळे उघडून स्पष्टपणे बघण्याचा दृष्टिकोनच नष्ट झाला.महात्मा गांधी दरभंगा येथल्या सभेत बोलायला उभे राहीले तेव्हा महिला पडद्याआड बसल्या होत्या हे बघून गांधीजी म्हणतात "पडद्याआड जो प्रेक्षकवर्ग बसला आहे त्या पडद्याचे दर्शन मला क्लेशकारक अनुभव देत आहे".यावेळी गांधीजींनी स्वत:च्या वेदना व्यक्त करून या प्रथेला पाळायला लावणाऱ्या पुरूष वर्गाला जबाबदार धरले व कठोर शब्दात राग व्यक्त केला.त्यांच्या बोलण्याचा सकारात्मक परिणाम होऊन बिहारी स्त्री—पुरूषांनी एका सभेला हजारोंच्या संख्येने उपस्थित राहून त्यात पडदा पध्दतीचा कायमचा त्याग करण्याची शपथ घेऊन आरोग्य व शिक्षण यास वाव द्यावा असा ठराव पास केला.[९] याठिकाणी गांधीजींच्या स्वातंत्र्य चळवळीच्या आवाहनाला प्रचंड प्रतिसाद देणारी जनता तितक्यात उत्साहाने प्रतिसाद सामाजिक विषमता मोडण्यासाठी देत होती असे दिसून येते.

**विचारांतील प्रासंगिकता :**

स्त्रियांच्या बाबतीत जर एखाद्या वेळेला आणिबाणीचा प्रसंग ओढवला तर स्त्रियांनी काय करावे यासाठी गांधीजी मार्गदर्शन करतात.जर दंग्यासारखे वातावरण उद्भवेल किंवा चोऱलुटारू अचानक घरावर आक्रमण करतील आणि अशावेळी स्त्रियांच्या अब्रुवर आक्रमण होईल तेव्हा यावेळी स्वत:चे नख़दात वापर प्रतिकारासाठी करावा व तेही शक्य न झाल्यास.हाताली येईल त्या शस्त्राचा वापर स्वरक्षण करण्यासाठी करावा असे गांधीजीनी सुचविला आहे.[१०] याठिकाणी समोरच्या व्यक्तीच्या आतील चांगला माणुस जागा होण्यासाठी वाट बघू नये असा व्यवहारी सला जो की पूर्णपणे गांधीजींच्या नेहमीच्या अहिंसेच्या तत्वाच्या विरोधी आहे गांधीजी द्यायला विसरत नाही.कारण अशावेळी गांधीजी हे तत्वापेक्षा तत्कालिक संकट कोणते व कोणावर आले ? याला जास्त महत्व देतात.अशा वेळेस ते तत्वांचा आग्रह धरत नाही.

 Copyright ⓒ 2020 Authors

**परदेशी महिलांच्या त्यागाचा अनुभव :**

गांधीजींनी स्वत:च्या आत्मचरित्रामधून त्यांच्या आयुष्यात महिलांच्या बाबतीत आलेल्या चांगल्या अनुभवांची नोंद त्यांच्या गुणांची कदर ते करतात.म्हणजे त्यांच्याकडे टाईपरायटर म्हणून काम करणारी मिस डिक नावाची कुमारीका होती जिच्याबद्दल गांधीजी म्हणतात की तिने लवकरच एका मुलीचे वा सख्या बहिणीचे स्थान पटकावले.त्यांच्या महत्वाच्या हिशोबाची नोंद तिने सांभाळली.पुढे तिने पती निवडीमध्ये गांधीजींचे सहकार्य घेतले.तशाच प्रकारची त्यांची लघुलेखिका मिसश्लेशिन होती जिच्या त्यागवृत्तीचे तोंडभरून गांधीजी कौतूक गांधीजी करतात व त्याग वृत्तीची नोंद घेतात.ते म्हणतात की मिस श्लेशिन ही रात्री—अपरात्री कामासाठी पाहीजे त्या ठिकाणी जायला तयार रहायची.तिने गांधीजींचा लाखो रूपयांचा व्यवहार इमानदारीने सांभाळला.[११] याठिकाणी लक्षात घेण्यासारखी बाब ही की गांधीजी खुल्या मनाने स्त्रियांच्या गुणांचे आलेल्या अनुभवातून कौतुक करतात याबाबतीत त्यांच्यात नैसर्गिक असणारा पुरूषी अहंकार दिसत नाही.

**जीवनाला कलाटणी :**

कस्तुरबा गांधी यांचा एक मोठा सहवास गांधीजींना पत्नीच्या रूपाने लाभला.त्यांच्या स्वभावात बदल घडवणारा व आखिल स्त्री—वर्गासंबधी दृष्टिकोनात परिवर्तन आणणारा एक प्रसंग गांधीजी नमुद करतात.घरात मोरी नसल्याने लघवीचे भांडे स्वत:लाच उचलावे लागे.भारतातून आलेल्या पंचम जातीच्या कारकुनाच्या लघवीचे भांडे कस्तुरबांना उचलावे लागले.दोघांच्या संवादातून कस्तुरबांना राग आला हे बघून गांधीजीनी त्यांचा हात धरून त्यांना घराबाहेर हाकलण्याची तयारी दर्शवली.पण कस्तुरबांनी निर्भयपणे एका भारतीय स्त्रीची दक्षिण आफ्रिकेतील असहायता व पुरूषांवरचे अवलंबित्व बोलून दाखवले. कस्तुरबांच्या शब्दात एक प्रकारे लपले होते की पुरूष हा स्त्रियांचे परावलंबित्व हे तिच्या गुलामिचे कारण समजून घेतो व तिच्या असहायतेचा फायदा घेतो.[१२] याठिकाणी गांधीजी खुल्या मनाने आपली चूक मान्य करतात. पुढे कधीही अशी गोष्ट कस्तुरबांच्या बाबतीत होऊ देत नाही. यातून एक शिकवण मिळते. स्वत: चूका कधीही खुल्या मनाने न स्वीकारणारा बहूतांश आखिल पुरूष समाज जो की स्त्रियांवर आपली हुकूमत दाखविणे व गुलामगिरी लादणे हा आपला परमधर्म समजतो. त्यांना गांधीजीचे हे उदाहरण म्हणजे एक सणसणीत चपराक आहे.यातून खरे तर एक मोठा बोध व शिकवण आपल्याला येथे लाभते.

**मूल्यमापन :**

गांधीजींच्या विचारांवर आईच्या सुसंस्कृत पारंपारिक नितीचा,कस्तूरबाच्या आयुष्याभराच्या सहवासाचा व त्यांच्या सान्निध्यात आलेल्या परदेशी व भारतीय महिलांच्या त्यागाचा विशेष प्रभाव

 Copyright ⓒ 2020 Authors

राहीला आहे.पण वेळोवेळी काळानुसार व परिस्थीतीनुसार त्यांची मते ही नेहमी बदलती व लवचिक राहीली आहेत.मग यासाठी स्वत:च्या लाडक्या प्राणपणाने जपलेल्या तत्वांना मुरड घालण्याची तयारी ते ठेवतात.व याबाबतीत महिलांना मार्गदर्शन करतात.त्यांच्या विचारात स्त्रियांवरची बंधने तोडावीत व त्यांच्या गुणांची चुणुक दाखवण्याची संधी दाखवू द्यावी असे सुचवितात.तर दुसऱ्या बाजुला त्यांना परिवार टिकावा .भारतीय पारंपारिक पध्दती व संस्कृती नष्ट होऊ नये म्हणून ते घरांच्या जुन्याच व्यवस्थेला कायम ठेवण्याचे महिला व पुरूषांना आवाहन देतात.असा विरोधाभासही त्यांच्या विचारात दिसुन येतो.हा भेद त्यांच्या राजकीय विचारांइतका गुढ नसला तरी सं□मात नक्की टाकणारा आहे.परंतू एका बाजुला संपूर्ण समाज व राष्ट्राचे ब्रिटीशविरोधी नेतृत्व करताना एक मोठा स्त्री घटक यावर विश्वास दाखविणे,त्यांना मूळ स्वातंत्र चळवळीच्या प्रवाहात पुरूषी बंधनातून आणणे ही फार मोठी गोष्ट होती. जी गोष्ट विचारांच्या सर्व मर्यादा ओलांडूण करणे शक्य नव्हते.एकूण असे म्हणता येईल की भारतीय स्वातंत्र्य चळवळीत पूर्ण वाहून घेतलेला एक प्रमुख महान नेता त्याने घेतलेली स्त्रियांच्या प्रश्नांविषयीची आस्था खरोखरच कौतुकास्पद व जगातील दुर्मिळ उदाहणांतील एक आहे.



**संदर्भसूची :**

१.संपादक.डॉ.सौ.अजमेरा सुर्यकांता. महात्मा गांधीजींची विचारधारा.अथर्व पब्लिकेशन्स् धुळे प्रथमआवृत्ती २०११.पान नं १४ ते १७


Copyright ⓒ 2020 Authors

ISSN: 2394-3114
Vol-40-Issue-89-March -2020

२. कित्ता पान नं.१५ ते १७

३. देसाई नारायण अनु.डॉ.शहा.मु.ब.व डॉ.पाटील विश्वासराव.आपले गांधी.गांधी संशोधन प्रतिष्ठान् जळगाव. पहीली आवृत्ती आक्टोंबर २००९.पान नं.१३० ते १३१.

४. कित्ता पान नं.१३१ ते १३३.

५. उपरोक्त 'महात्मा गांधीजींची विचारधारा' पान नं १७ ते १८

६. कित्ता पान नं.पृ १८

७. प्रीती करमरकर अनु.प्रविण चव्हाण,स्त्रीवादी सिध्दांकन आणि ज्ञाननिर्मिती स्त्री अभ्यास केंद्र समाजशास्त्र विभागपुणे.जुलै १९९९.पान नं.९ ते २५.

८. सामंत मंगलास्त्री—पर्व.दसरी आवृत्ती २००८.नेटवर्क प्रकाशन.पान नं. १८२.

९. कित्ता पान नं.१८२ ते १८३.

१०. श्री.कुळकर्णी गोपाळराव.गांधीवादावरील काही आक्षेप प्रकाशक महाराष्ट ग्रंथ भांडार मुंबई. सन.१९४४.पान नं.१३.

११.मो.क.गांधी अनु.सीताराम पटवर्धन् माझे सत्याचे प्रयोग.रिया पब्लिकेशन. कोल्हापुर. आवृत्ती जाने.२०१३.पान नं.२८३ ते २८४.

१२.कित्ता पान नं. २१० ते २११.


Copyright ⓒ 2020 Authors